कर आकारणी कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक -

# प्रेस नोट

## "मिळकतकराचा भरणा करणेकामी पुणे महानगरपालिका अंतर्गत नागरी सुविधा केंद्र (CFC) दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील सुरु असणार आहेत"

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना मिळकतकर भरणा करणे सुकर व्हावे यास्तव विविध क्षेत्रिय कार्यालय व संपर्क कार्यालयांतर्गत नागरी सुविधा केंद्र (CFC) चालू करण्यात आले आहे. सन २०२५-२६ हे आर्थिक वर्ष दि. ३१ मार्च २०२६ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे वर्ष अखेरीस मिळकतकर भरणा करावयास नागरिकांची गर्दी होते.

सदर कालावधीत मिळकतकराचा भरणा करणे नागरिकांना सोयीस्कर होणेकामी पुणे महानगरपालिका अंतर्गत सर्व नागरी सुविधा केंद्र (CFC) संपर्क कार्यालये दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील सुरु ठेवण्यात येणार आहे. सदर नागरी सुविधा केंद्र (CFC) दि. २९ मार्च २०२६ पर्यंत स. ९.४५ ते सां. ४.०० वा. पर्यंत सुरु रहाणार आहेत व दि. ३० व ३१ मार्च २०२६ रोजी स. ९.४५ ते रा. ८.०० वा. पर्यंत सुरु रहाणार आहेत.

तरी ज्यांनी मिळकतकराचा भरणा अद्यापपर्यंत केलेला नाही त्यांना आवाहन करण्यात येते की, विहित मुदतीत मिळकतकराचा भरणा करून सहकार्य करावे अन्यथा कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत नियमोचित कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका